# प्रकरण ६ भारताची उच्चस्तरीय संरक्षण संघटना

भारत लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाहीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नागरिकांना किंवा लोकप्रतिनिधींना असतो. ही नागरी सत्ता आहे. सैन्यदलाचे सर्वोच्च प्रमुख राष्ट्रपती असतात. राष्ट्राच्या संरक्षणाची जबाबदारी मंत्रीमंडळाची असते. देशाच्या संरक्षण आणि सुरक्षा बाबींसंबंधी सरकारला धोरणात्मक दिशा देण्याचे मुख्य काम संरक्षण मंत्रालयाचे असते. त्या धोरण अंमलबजावणीसाठी सैन्यदलांचे मुख्यालय, आंतरसेवा संघटना, संरक्षण उत्पादन संघटना आणि संरक्षण संशोधन आणि विकास संघटना यांची मदत घेतली जाते.





भारताचे भौगोलिक स्वरूप अद्‌वितीय आहे. भारताची भूसीमा शेजारील सात देशांशी संलग्न असून तिची लांबी सुमारे १५००० कि.मी. आहे. भारताच्या सागरी सीमेची लांबी सुमारे ७५०० कि.मी. आहे. भूसीमा आणि सागर सीमेच्या रक्षणाची जबाबदारी सेनादलांकडे आहे.

**संरक्षण मंत्रालय :–** संरक्षण मंत्रालयाचे चार विभाग आहेत. ते पुढीलप्रमाणे–

**१) संरक्षण विभाग :** संरक्षण विभागाचा स्थलसेना, वायुसेना, नौसेना, तटरक्षक दल, आणि आंतरसेवा संघटना यांच्याशी संबंध असतो. हा विभाग संरक्षण अंदाजपत्रक, संरक्षणाशी निगडित संस्था, संरक्षण धोरण, संसदेशी संबंधित बाबी, इतर देशांशी संरक्षण सहकार्य, संरक्षणासंबंधित उपक्रमांमधील समन्वय साधण्याचे कार्य करतो.

**२) संरक्षण उत्पादन विभाग :** भारतात संरक्षण उत्पादन विभाग १९६२ मध्ये अस्तित्वात आला. या विभागाची निर्मिती करण्यामागे संरक्षणासाठीची शस्त्रास्त्रे, शस्त्रप्रणाली, त्यासाठीचे प्लॅटफॉर्म, उपकरणे यांच्या उत्पादनासाठी सर्वसमावेशक संरचना विकसित करणे हा हेतू होता. या विभागांतर्गत सरकारी मालकीचे सार्वजनिक संरक्षण प्रकल्प आणि शस्त्रनिर्मिती (ऑर्डनन्स) कारखाने उभारण्यात आले. या प्रकल्पांतर्गत कारखान्यांमधून शस्त्रास्त्रे, रणगाडे, चिलखती वाहने, अवजड वाहने, लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर्स, युद्‌धनौका, पाणबुड्या, क्षेपणास्त्रे, दारूगोळा, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, अर्थमुव्हिंग उपकरणे, विशेष हेतूने वापरण्यासाठीचे मिश्रधातू इत्यादींचे उत्पादन केले जाते.

संरक्षण उत्पादनात स्वयंपूर्णता आणणे आणि त्यासाठी सक्षम होण्यासाठी ऑर्डनन्स कारखाने आणि सरकारी मालकीच्या सार्वजनिक संरक्षण प्रकल्पामध्ये सातत्याने आधुनिकीकरण आणि सुधारणा केली जात आहे.



३) **संरक्षण संशोधन आणि विकास संघटना :** संरक्षण मंत्रालयास तांत्रिक आणि वैज्ञानिक सल्ला देण्यासाठी संशोधन आणि विकास संघटनेची स्थापना १९५८ मध्ये करण्यात आली. संरक्षण प्रणालींमध्ये स्वयंपूर्णता आणणे आणि तिन्ही सेनादलांच्या गरजेप्रमाणे शस्त्रास्त्र प्रणाली आणि उपकरणाचा आराखडा तयार करणे व त्याचा विकास करण्याचे कार्य ही संघटना करते. संरक्षण संशोधन आणि विकास संघटना १) हवाई शस्त्रास्त्रे २) लढाऊ वाहने ३) इलेक्ट्रॉनिक्स ४) इंजिनिअरींग उपकरणे, ५) क्षेपणास्त्रे ६) नाविक दलातील जहाजांवरील शस्त्रप्रणाली ७) प्रगत संगणक, सिम्युलेशन व जैवविज्ञान यांच्याशी संबंधित विविध प्रकारच्या लष्करी तंत्रज्ञानावर कार्य करते.

४) **माजी सैनिक कल्याण विभाग :** २००४ मध्ये संरक्षण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली हा विभाग अस्तित्वात आला. निवृत्त सैनिकांचे कल्याण व पुनर्वसन यासाठी हा विभाग काम करतो. त्यानुसार हा विभाग सैनिकांच्या कल्याणासंबंधीची धोरणे व उपक्रम राबवत असतो. या विभागाचे पुनर्वसन शाखा आणि निवृत्ती वेतन शाखा असे उपविभाग आहेत.

मार्फत निश्चित करणे या दोन तत्त्वांवर आधारित आहे. सैन्यदले युद्ध आणि शांततेच्या निर्णयात योगदान देतात, परंतु अंतिम निर्णय संरक्षण समिती आणि प्रधानमंत्री घेत असतात.

स्वतंत्र भारताची उच्चस्तरीय संरक्षण संघटना त्रिस्तरीय होती. ते स्तर पुढीलप्रमाणे–

१) **कॅबिनेटची सुरक्षा समिती :** या समितीचे प्रमुख प्रधानमंत्री असतात. या समितीमध्ये प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्र व्यवहार मंत्री, आणि अर्थमंत्री असतात. ही समिती कॅबिनेट सचिवालयाच्या लष्करी विभागाचाच एक भाग आहे. (१०/०३/२०१८ रोजीची रचना)

२) **संरक्षण मंत्र्यांची समिती :** या समितीचे प्रमुख संरक्षणमंत्री असतात. .

३) **सेनादल प्रमुखांची समिती :** या समितीचे प्रमुख तिन्ही सेनादलांतील जेष्ठ सेनाप्रमुख असतात

१९६२ भारत-चीन युद्धानंतर कॅबिनेट सुरक्षा समितीचे नाव कॅबिनेटची आपत्कालीन समिती करण्यात आले, नंतर ती समिती कॅबिनेटचा राजकीय व्यवहार समिती म्हणून ओळखली जाऊ लागली. या समितीचे नाव पुन्हा बदलण्यात आले

**उच्चस्तरीय संरक्षण संघटना**

**राष्ट्रपती – (राष्ट्रप्रमुख)**

↓

**प्रधानमंत्री – (सरकारचे प्रमुख)** ←

↓

**कॅबिनेटची सुरक्षा समिती**

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार
राष्ट्रीय सुरक्षा मंडळ
युद्धनैतिक धोरण गट
संयुक्त इंटेलिजन्स समिती
राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळ

**कॅबिनेटची सुरक्षा समिती :**
या समितीमध्ये प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्र व्यवहार मंत्री आणि अर्थमंत्री असतात.
(१०/०३/२०१८ रोजी रचना)

## उच्चस्तरीय संरक्षण संघटना

भारताची उच्चस्तरीय संरक्षण संघटना ही राजकीय प्रतिनिधी आणि सैन्यदले यांच्यात संवाद निर्माण करणे आणि सुरक्षेशी संबंधित बाबी राजकीय प्रतिनिधींच्या

व ती कॅबिनेटची सुरक्षा समिती झाली. त्याचप्रमाणे संयुक्त नियोजन समिती, संयुक्त इंटेलिजन्स समिती, संयुक्त प्रशिक्षण समिती आणि आंतरसेवा उपकरण धोरण समिती अशाही अनेक समित्या आहेत.

## राष्ट्रीय सुरक्षा परिषद

राष्ट्रीय सुरक्षा मंडळाची स्थापना १९९८ मध्ये झाली. हे मंडळ दूरगामी युद्धनैतिक हित आणि राष्ट्रीय सुरक्षा यासंबंधीचा सल्ला प्रधानमंत्री कार्यालयास देते. संरक्षणमंत्री, परराष्ट्र व्यवहार मंत्री, अर्थमंत्री, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, राष्ट्रीय सुरक्षा उपसल्लागार, आणि नीती आयोगाचे उपप्रमुख हे या समितीचे सभासद असतात. राष्ट्रीय सुरक्षा मंडळ हे उच्चस्तरीय संरक्षण संघटनेतील सर्वोच्च मंडळ आहे.

उच्चस्तरीय संरक्षण संघटनेचे दोन स्तर आहेत. ते पुढीलप्रमाणे–

१) **युद्धनैतिक धोरण गट :** हा गट देशाच्या सुरक्षेला असलेल्या तात्कालिक व दूरगामी धोक्यांची चिकित्सा करून धोरण व पर्यायी सुरक्षा धोरण तयार करण्याचे कार्य करतो. कॅबिनेटचे मुख्य सचिव या गटाचे प्रमुख असतात. तिन्ही सैन्यदलांचे प्रमुख, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, विविध मंत्रालयांचे सचिव आणि इंटेलिजन्स ब्युरोचे संचालक हे या गटाचे सभासद असतात.

२) **संयुक्त इंटेलिजन्स समिती :** ही राष्ट्रीय सुरक्षा मंडळाकरिता शत्रुविषयक माहितीची चिकित्सा करण्याचे कार्य करते.

राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळ हे राष्ट्रीय सुरक्षा मंडळाच्या समस्यांचा सखोल अभ्यास करून संशोधन करणाऱ्या तज्ज्ञांचे मंडळ (Think Tank) असते. या मंडळात बाह्य सुरक्षा, युद्धनैतिक चिकित्सा, परराष्ट्र व्यवहार, संरक्षण, सेनादले, अंतर्गत सुरक्षा, अर्थशास्त्र, विज्ञान व तंत्रज्ञान यासंबंधीचे तज्ज्ञ असतात.

## एकात्मिक संरक्षण सेनाधिकारी मंडळ

भारत सरकारने एकात्मिक संरक्षण सेनाधिकारी मंडळाची रचना २००१ मध्ये केली. संरक्षण मंत्रालयातील विविध लोकांना एका ठिकाणी आणून संघटनात्मक स्वरूप निर्माण करण्याचा त्यामागे हेतू होता. हे मंडळ एकात्मिक सुरक्षा धोरण, सुरक्षा सिद्धांत, युद्ध साहित्य हे एका छत्राखाली आणते.

एकात्मिक संरक्षण सेनाधिकारी मंडळाची (Integrated Defence Staff) कार्ये पुढीलप्रमाणे असतात.

१) **उच्चस्तरीय संरक्षण धोरण :** विविध संघटनांचा हा संयुक्त उपक्रम असतो. ही राष्ट्रीय सुरक्षेसाठी युद्धनीती आणि युद्ध योजना बनवण्याचे कार्य करते. (उच्चस्तरीय संरक्षण धोरणाचा आराखडा पहा.)

२) **अभ्यास :** भारतीय सैन्यदले द्विपक्षीय वा बहुपक्षीय कवायती इतर देशांसोबत नियमितपणे सहभागी होतात. या कवायती किंवा अभ्यास विशेष सेना किंवा सेनादलांकरता असतो.

३) **आपत्तीकाळातील मानवीय मदत :** संयुक्त संरक्षण सेनाधिकारी मंडळ देशातील किंवा देशाबाहेरील आपत्तीच्या काळात मदत देत असते. त्यात पुनर्वसनासाठीच्या संरचना तयार करणे, दळणवळणाच्या सोयी करणे, वैद्यकीय सेवा देणे, अन्न व कपडे पुरवणे इत्यादी कामांचा समावेश होतो.

४) **संपादन कार्य :** या संघटनेकडून लष्करास आवश्यक ती लघु, मध्यम व दूरगामी स्वरूपाची उपकरणे, शस्त्रास्त्रप्रणाली व त्यासाठीचे प्लॅटफॉर्म यांसंबंधीचे संपादनाचे कार्य केले जाते.

५) **अंदाजपत्रक :** एकात्मिक संरक्षण सेनाधिकारी मंडळ संरक्षण सेवासाठीच्या विविध आर्थिक बाबींकडे लक्ष देत असते. ते मंडळ संरक्षणाच्या विविध प्रकल्पासाठीच्या आर्थिक तरतुदी व देखरेखीसाठीच्या खर्चासाठी जबाबदार असते.

६) **प्रशिक्षण :** सैन्यदलांच्या प्रशिक्षणाच्या गरजांकडेही हे मंडळ लक्ष देत असते.

७) **आंतरराष्ट्रीय सहकार्य :** एकात्मिक संरक्षण सेनाधिकारी मंडळ आंतरराष्ट्रीय सहकार्यासंबंधीच्या सर्व बाबी हाताळते, तसेच भारताच्या परराष्ट्र धोरणात संरक्षण सहकार्याची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार असते.

८) **वैद्यकीय :** एकात्मिक संरक्षण सेनाधिकारी मंडळ लष्कराचे वैद्यकीय धोरण, सैन्यदलांचे आरोग्य, आण्विक, जैविक व रासायनिक युद्धातील वैद्यकीय बाबी व आपत्कालीन मदतीच्या बाबी पाहात असते.

### जॉईंटमनशिप (Jointmanship)

स्थळ आणि काळाच्या चौकटीत तिन्ही सैन्यदलांची सामाईक, कार्यरत आणि डावपेचात्मक पातळीवर लढण्याच्या क्षमतेचे एकात्मिक नियोजन व उपाययोजना म्हणजे लष्करासंबंधी जॉईंटमनशिप होय.

शत्रूची स्थिती आणि आपल्या गरजा यांनुसार हे कार्य केले जाते. याचे अंतिम ध्येय युद्ध जिंकणे हे असते. तिन्ही सैन्यदलांनी एकत्रितपणे लष्करी डावपेच आखण्यासाठी सहकार्य करणे हे काळानुरूप तपासले गेलेले युद्धाचे तत्व आहे. एकत्रित प्रशिक्षण, एकमेकांच्या क्षमतांची जाणीव आणि त्यांच्या मर्यादा तसेच परस्परांप्रती विश्वास आणि आदर यांच्यातून उत्तम जॉईंटमनशिप निर्माण होते.

### सामायिक लष्करी कृती (Joint Operations)

एका जॉईन्ट टास्क फोर्स कमांडरच्या अधिकारात दोन किंवा अधिक सैन्यदलांनी नियोजन करून एकत्रित लष्करी कृती करणे म्हणजे जॉईंट ऑपरेशन होय. या कृती साधारणतः विशेष उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून केल्या जातात.

**उच्चस्तरीय संरक्षण नियोजन**

↓

**कॅबिनेटची सुरक्षा समिती**

↓

**संरक्षण मंत्री** ← **संरक्षण मंत्रालय**

↓

**संरक्षण नियोजन समिती**

(राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, सैन्यदलाचे प्रमुख, सैन्यदलांच्या प्रमुखांची समिती, संरक्षण सचिव, परराष्ट्र व्यवहार सचिव)

↓

**सैन्यदल प्रमुखांची समिती**

(तिन्ही सैन्यदल प्रमुख आणि प्रमुखांची समिती)

↓

**उप प्रमुखांची समिती (चिफ ऑफ स्टाफ कमिटी आणि सर्व्हिस उप-प्रमुख)**

↓

**एकात्मिक संरक्षण सेनाधिकाऱ्यांचे मंडळ कार्यालय** | **संरक्षण मंत्रालयाचे एकात्मिक मुख्यालय (स्थलसेना, वायुसेना, नौसेना)**

## सशस्त्रे सैन्यदले

संरक्षण मंत्रालयाच्या नियंत्रणाखाली स्थलसेना, वायुसेना व नौसेना ही सैन्यदले असतात. या सशस्त्रदलांचे प्रमुख कार्य परकीय आक्रमणापासून देशाचे संरक्षण करून देशाचे सार्वभौमत्व अबाधित राखणे हे आहे. नैसर्गिक आपत्तीच्यावेळी, देशात अस्थिरता निर्माण होते त्यावेळी व अंतर्गत संघर्ष होऊन अंतर्गत सुरक्षा धोक्यात येते त्यावेळी सशस्त्रदले सरकारला मदत करत असतात.



**स्थलसेनेचे कार्य :** परकीय आक्रमणापासून राष्ट्रहिताचे संरक्षण करणे आणि देशांतर्गत कायदा आणि सुरक्षा राखण्यासाठी सज्ज असणे हे स्थलसेनेचे महत्त्वाचे कार्य आहे. त्यानुसार स्थलसेना पुढीलप्रमाणे कार्य करते.

१) परकीय आक्रमणास परतवून लावणे.

२) देशांतर्गत धोक्यांचे निवारण करणे.

३) राष्ट्रहितास बाधा निर्माण होते त्यावेळी मदत करणे.

४) शांतता रक्षणाच्या मोहिमेत सहभागी होणे आणि मित्र देशांना लष्करी मदत करणे.

५) आपत्तीकाळात नागरिकांना मानवीय स्वरूपाची मदत करणे.

### स्थलसेनेचे विभाग (कमांडस्)

भारताच्या भौगोलिक संरक्षणाच्या दृष्टीने देशात स्थलसेनेचे सहा विभाग (कमांडस्) कार्यरत आहेत. कमांडच्या रणक्षेत्रीय रचनेत एका कमांडमध्ये दोन किंवा तीन कोअर असतात, एका कोअरमध्ये दोन ते चार डिव्हीजन्स असतात, एका डिव्हीजनमध्ये चार ते पाच ब्रिगेडस् असतात. प्रत्येक ब्रिगेडमध्ये तीन ते चार बटालियन्स किंवा रेजिमेंट असतात. एका बटालियन मध्ये चार कंपन्या असतात. एका कंपनीत तीन प्लाटून्स असतात व एका प्लाटून मध्ये तीन सेक्शन असतात एक सेक्शनमध्ये १० सैनिक असतात व ते स्थलसेनेतील सर्वात लहान युनिट असते. या सहा रणक्षेत्रीय कमांड व्यतिरिक्त एक प्रशिक्षण कमांड असते. त्यात स्थलसेनेतील सैनिकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य केले जाते.

कमांडच्या रचनेत शांतता आस्थापनेखाली एरिया आणि उपएरिया, स्टेशन ह्या संघटना असतात. त्या अंतर्गत त्या त्या परिसरातून सैनिकांना अन्न, युद्धसामग्री रसद व इतर वस्तूंचा पुरवठा केला जातो.

प्रादेशिक कमांड्स : स्थलसेनेचे सहा विभाग (कमांडस्) पुढीलप्रमाणे–

१) **उत्तर कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय उधमपूर येथे आहे. या कमांडचे कार्यक्षेत्र जम्मू काश्मीर असून काश्मीरच्या पूर्वेकडील चीन व पश्चिमेस पाकिस्तानच्या कारवायांपासून सुरक्षितता राखण्याचे कार्य हे कमांड करते.

२) **पश्चिम कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय चंदिगड येथे असून त्याचे कार्यक्षेत्र पंजाब व हिमाचल प्रदेश आहे. या राज्यांच्या पूर्वेस असणाऱ्या चीनच्या व पश्चिम भागातील पाकिस्तानच्या कारवायांवर लक्ष ठेवण्याचे कार्य हे कमांड करते.

३) **नैऋत्य कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय जयपूर येथे आहे. हे कमांड उत्तर व मध्य राजस्थानलगत क्षेत्रातील भागात पाकिस्तानच्या कारवायांच्या विरोधात कार्य करते.

४) **दक्षिण कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे. हे कमांड दक्षिण राजस्थान व गुजरात राज्याच्या पश्चिमेकडील भागात पाकिस्तानच्या कारवायांविरोधी कार्य करते.

५) **मध्य कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय लखनौ येथे आहे. हे कमांड उत्तराखंडाच्या उत्तरेस चीनच्या, उत्तर प्रदेश व बिहारशी संलग्न इंडो नेपाळ सीमा सुरक्षेसाठी जबाबदार आहे.

६) **पूर्व कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय कोलकाता येथे आहे. त्याच्याकडे सिक्कीम, भूतान आणि अरुणाचल प्रदेशात चीनच्या कारवाया व इंडो नेपाळ सीमा, म्यानमार व बांगलादेश सीमासुरक्षेची जबाबदारी आहे.

## नौसेना




**भारतीय नौदलाचे कार्य :** स्वातंत्र्यानंतर भारताच्या नौदलाची झपाट्याने वाढ होत आहे. आज नौदलाचे आधुनिकीकरण होत असून नवनवीन लढाऊ जहाजांची त्यात भर पडत आहे. भारतीय नौदलाचे कार्य पुढीलप्रमाणे–

१) **लष्करी कार्य :** भारतीय नौदलाचे सामर्थ्य आक्रमक आणि बचावात्मक स्वरूपात उपयोगात आणले जाते. आपला समुद्रकिनारा आणि सागरी शत्रूंच्या कारवायांविरुद्ध आक्रमक आणि आपल्या भूप्रदेशाचे व व्यापाराचे संरक्षण करण्यासाठी बचावात्मक कार्य करते.

२) **राजनयाचे कार्य :** भारताचे राष्ट्रहित आणि राष्ट्रीय सुरक्षेची उद्दिष्टे सागरी धोरणात पद्धतशीरपणे मांडण्याचे कार्य नौदलाकडून केले जाते.

३) **पोलिसी कार्य :** भारताची सागरी सुरक्षा हे महत्त्वाचे कार्य भारतीय नौदलाचे आहे. किनाऱ्यालगतच्या भूभागात कायद्याची अंमलबजावणी करण्याचे कार्य नौदलाचे आहे. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर समुद्र किनाऱ्याच्या सुरक्षेची जबाबदारी नौदलाकडे आली. मरीन पोलीस, पोर्ट ट्रस्ट (बंदर) प्राधिकरण, राज्य व केंद्र सरकार आणि तटरक्षक दल आणि नौदल हे सर्व परस्परांच्या सहकार्याने हे काम करतात. नौदलांच्या प्रमुखाचा हुद्दा चीफ ऑफ नेव्हल स्टाफ (नौसेनाध्यक्ष) असतो. त्यांचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे आहे.

**नौदलाचे कमांड्स** – नौदलाचे तीन कमांडस् असून ते भौगोलिक संरक्षणाच्या तत्त्वावर अस्तित्वात आले आहेत. ते कमांडस् पुढीलप्रमाणे–

१) **पश्चिम नौदल कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे. पश्चिम आरमाराची विविध जहाजे गुजरात, महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्याच्या किनाऱ्यावरील नाविक बंदरांवर असतात. या पश्चिम किनाऱ्याच्या संरक्षणाची मुख्य जबाबदारी या कमांडची आहे.

२) **पूर्व नौदल कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय विशाखापट्टणम् येथे आहे. पूर्व आरमाराची विविध जहाजे बंगाल, ओडिसा, आंध्रप्रदेश आणि तामिळनाडू राज्याच्या किनाऱ्यावरील तळांवर असतात. या कमांडची मुख्य जबाबदारी पूर्व किनाऱ्याचे रक्षण करणे ही आहे.

३) **दक्षिण नौदल कमांड :** या कमांडचे मुख्य कार्यालय कोची येथे आहे. या कमांडमधील जहाजे लक्षद्वीप आणि केरळच्या किनाऱ्यावरील नौदलच्या तळांवर असतात.

## भारतीय वायुसेना




**वायुसेनेचे कार्य :** वायुसेना लष्करातील आधुनिक तंत्रज्ञान प्रणालीमध्ये महत्वाचे सेनादल मानले जाते. राष्ट्राच्या हवाई अवकाशाचे रक्षण करणे हे वायुसेनेचे ध्येय असते. भारतीय वायुसेना भारताच्या हवाई अवकाशाचे रक्षण करण्याची जबाबदारी सांभाळते. तसेच राष्ट्रहित राखण्यासाठी इतर सैन्यदलांशी सहकार्य करते. भारतीय वायुसेना आपल्या स्थलसेनेस रणांगणावर, युद्धनीतीत आणि रणक्षेत्रात सैनिकांची व लष्करी साहित्याची ने-आण करण्यास मदत करते.

**हवाई कमांडस् :** भारतीय वायुसेनेचे सात विभाग (कमांडस्) असून पाच कार्यशील कमांडस् (Operational Commands) आणि दोन प्रशासकीय कमांडस् आहेत. ते पुढीलप्रमाणे-

| कार्यशील विभाग | मुख्य कार्यालय |
|---|---|
| मध्य हवाई विभाग (सेंट्रल एअर कमांड) | अलाहाबाद |
| पूर्व हवाई विभाग (इस्टर्न एअर कमांड) | शिलाँग |
| पश्चिम हवाई विभाग (वेस्टर्न एअर कमांड) | नवी दिल्ली |
| दक्षिण हवाई विभाग (सदर्न एअर कमांड) | तिरूअनंतपुरम |
| नैऋत्य हवाई विभाग (साऊथ वेस्टर्न एअर कमांड) | गांधीनगर |
| **प्रशासकीय विभाग** | **मुख्य कार्यालय** |
| हवाई देखभाल विभाग (मेंटनन्स एअर कमांड) | नागपूर |
| हवाई प्रशिक्षण विभाग (ट्रेनिंग एअर कमांड) | बंगळूरु |

## संयुक्त सेनादलांचे कमांड

### अंदमान निकोबार कमांड

या कमांडचे मुख्य कार्यालय पोर्टब्लेअर येथे असून हे भारतातील तिन्ही सेनादलांसाठीचे पहिले संयुक्त कमांड आहे. स्थलसेना, वायुसेना व नौसेना हे आळीपाळीने या कमांडचे नेतृत्व करतात. या कमांडअंतर्गत तिन्ही सेनादले व तटरक्षक दल कार्य करत असतात. या कमांडद्वारे मलाक्काची सामुद्रधुनी व आग्नेय आशियाच्या क्षेत्रात आपल्या राष्ट्रहिताचे रक्षण करण्याचे कार्य केले जाते.



**अंदमान आणि निकोबार कमांड**

## तटरक्षक दल

१९७८ मध्ये तटरक्षक दलांची स्वतंत्र संघटना तयार केली गेली. ह्या दलांची चार प्रादेशिक मुख्यालये (गांधीनगर, मुंबई, चेन्नई आणि पोर्टब्लेअर) आहेत.

तटरक्षक दलाची प्रमुख कार्ये खालील प्रमाणे :

१) मानव निर्मित बेटे, ऑफशोर टर्मिनल (समुद्रातील तेलाची टर्मिनल) आणि इतर स्थानके यांची सुरक्षा तसेच रक्षण करणे.

२) मच्छीमार समुद्रात असताना त्यांना मदत करणे तसेच त्यांचे रक्षण करणे.

३) सागरी पर्यावरणाचे रक्षण करणे.

४) सागरी तस्करी विरुद्ध कारवाईत मदत करणे.

मुंबईवरील दहशतवादी हल्ला (२००८) करणारे दहशतवादी समुद्रमार्गे आले होते. त्या हल्ल्यानंतर सागरी सुरक्षिततेचे कार्यदेखील तटरक्षक दलांकडे देण्यात आले आहे.

## केंद्रीय सशस्त्र पोलीस दल/निमलष्करी सेना दल

भारत सरकारच्या गृहखात्यांतर्गत विविध केंद्रीय सशस्त्र पोलीस दल अस्तित्वात आहेत. या दलांना राष्ट्राच्या अंतर्गत सुरक्षिततेच्या गरजेनुसार विविध भूमिका पार पाडण्यासाठी तैनात केले जाते. त्यांना आंतरराष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून इतर अशांत राष्ट्रांमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाठवले जाते. तसेच भारताचे राष्ट्रीय हित जोपासण्यासाठी सुद्धा इतर ठिकाणी त्यांना तैनात केले जाते.

**आसाम रायफल्स (AR) :** ही एक विशिष्ट विभागाशी संबंधित अशी संघटना असून तिची प्रमुख भूमिका ही ईशान्य भारतापुरती मर्यादित आहे. या संघटनेच्या आजपर्यंत एकूण ४६ बटालियन्स आहेत. या संघटनेची प्रमुख भूमिका ही ईशान्येकडील राज्यांमध्ये असलेल्या राष्ट्रविद्रोही तत्वांविरोधात कठोर भूमिका घेणे व तेथे शांतता प्रस्थापित करणे अशी असून इतर भागातही अशीच समस्या निर्माण झाल्यास स्थलसेनेच्या नेतृत्वाखाली कार्य करते. शांतता व परभारी युद्ध (Proxy War) काळात भारत-चीन, तसेच भारत-म्यानमार सीमेवर सुरक्षा प्रस्थापित करणे. युद्धकाळात आघाडीच्या सेनेच्या मागे राहून अंतर्गत भागातील सुरक्षा सांभाळते.

**सीमा सुरक्षा दल (BSF) :** भारतीय सीमांच्या सुरक्षा व व्यवस्थापनातील ही सर्वात मोठी संघटना आहे. भारत-पाक आंतरराष्ट्रीय सीमेवरील गुजरात येथील सर खाडीपासून जम्मू विभागापर्यंत व त्यापुढे उत्तर काश्मीर पर्यंत या संघटनेला तैनात केले आहे. भारत-बांगलादेश सीमेच्या रक्षणासाठी देखील ही संघटना तैनात केली आहे. शांतता काळात या संघटनेच्या जबाबदाऱ्या पुढील प्रमाणे :

- सीमावर्ती भागात राहणाऱ्या जनतेमध्ये सुरक्षेची भावना वृद्धिंगत करणे.
- भारतीय हद्दीत अनधिकृत प्रवेश करणे अथवा अनधिकृतरीत्या सीमेपलीकडे जाणे व सीमेवरील गुन्ह्यांवर आळा घालणे.

- चोरटा व्यापर (तस्करी) व इतर अनधिकृत कारवायांवर आळा घालणे.

**युद्धकालीन जबाबदाऱ्या :**

- युद्धकाळात आघाडीवरील स्थलसेनेस सहकार्य करण्यासाठी विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडणे.
- स्थलसेनेच्या सैन्यचौक्यांचे संरक्षण करणे, लढाऊ सेनेच्या लगतच्या मागील भागाची सुरक्षा, संरक्षणाच्या दृष्टीने महत्वाच्या ठिकाणाची सुरक्षा, पुरवठा व्यवस्था व संपर्क व्यवस्था यांच्या सुरक्षेची जबाबदारी या संघटनेवर असते.

**केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF) :** हे सुरक्षा दल बहुकुशल सुरक्षा दल आहे. भारताचे महत्त्वाचे प्रकल्प प्रामुख्याने आण्विक प्रकल्प, अंतराळ संस्था, विमानतळे, बंदरे, ऊर्जा प्रकल्प, संवेदनशील सरकारी कॉरपोरेशनच्या इमारती व ऐतिहासिक वारसास्थळे यांना सुरक्षा देण्याचे काम CISF करते. दिल्ली मेट्रो रेल सुरक्षिततेची जबाबदारी देखील या दलाकडे आहे.

**केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) :** भारतातील सर्वात मोठे राखीव पोलीस दल आहे. त्यांच्या कार्याचे स्वरूप व्यापक आहे. त्यात जम्मू-काश्मीरमधील प्रतिविप्लव, मध्य आणि दक्षिण भारतातील राज्यांमधील नक्षलग्रस्त क्षेत्र आणि अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, महत्वाची स्थाने, निवडणुकी दरम्यानची सुरक्षा, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, दंगे, बंडखोरीच्या वेळी, स्थानिक पोलिसांना मदत इत्यादी कामांचा समावेश होतो.

**भारत तिबेट सीमा पोलीस दल (ITBP) :** लडाख मधील काराकोरमच्या खिंडीपासून अरूणाचल मधील जाचेपला पर्वता पर्यंत साधारणतः ३४८८ किलोमीटरच्या भारत-चीन सीमा प्रवेशाची आणि ९००० फूट ते १८७०० फूट उंचीवरील भारत-चीन सीमेवरील टेहळणी नाके यांची सुरक्षा हे दल करते. छत्तीसगडमध्ये प्रतिविप्लव कार्याची जबाबदारीदेखील या दलाकडे आहे. या दलांची इतर कार्य खालीलप्रमाणे आहेत.

- बेकायदेशीर स्थलांतर, तस्करी आणि इतर गुन्हे यावर नियंत्रण ठेवणे.
- संवेदनशील स्थानके, बँका, महत्वाच्या व्यक्ती आणि ठिकाणे यांना सुरक्षा देणे.
- आपत्तीकाळात मदत कार्य करणे.

**सशस्त्र सीमा बल (S.S.B) :** गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली काम करणारे निमलष्करी दल आहे. नेपाळ आणि भूतानबरोबरच्या भारताच्या उत्तराखंड, उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, सिक्किम, आसाम यांच्या सीमा रेषांची देखरेख करणे. तसेच तस्करी, बेकायदेशीर स्थलांतर यांवर नियंत्रण ठेवणे.

**तुम्हांला माहीत आहे का?**

एक सीमा एक सैन्यदल या तत्वानुसार सीमेवर सेनादले तैनात केली जातात. भारतीय सीमेवर तैनात असलेली सेनादले खालीलप्रमाणे-

- बांगलादेश आणि पाकिस्तान सीमा-सीमा सुरक्षादल
- चीन सीमा-इंडो तिबेट सीमा पोलीसदल
- नेपाळ व भूतान सीमा-सशस्त्र सेना बल
- म्यानमार सीमा-आसाम रायफल

**Please see the following website for further information :**

**1.** Indian Armed Forces.

http://knowindia.gov.in/my-india-my-pride/indian-armed-forces.php

**2.** Ministry of Defence, Government of India, Annual Reports
https://mod.gov.in/documents/annual-report

**प्र.१. अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) आण्विक प्रकल्प, अंतराळ संस्था, विमानतळे, बंदरे, ऊर्जा प्रकल्प यांची सुरक्षा ..... दलाकडे आहे.

अ) इंडो तिबेट सीमा पोलीस दल

ब) सशस्त्र सीमा बल

क) केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल

ड) भारतीय स्थलसेना

२) पूर्व नौदल कमांड मुख्य कार्यालय ....... येथे आहे.

अ) विशाखापट्टणम्

ब) चेन्नई

क) कोलकाता

ड) मुंबई

**प्र.३. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

i) राष्ट्रपती कॅबिनेट सुरक्षा समितीचे सदस्य असतात.

ii) श्रीलंकेची सुरक्षा बघणे हे तटरक्षक दलाचे कार्य आहे.

**प्र.४. सहसंबंध स्पष्ट करा.**

जॉईंटमनशिप आणि जॉईंट ऑपरेशन.

**प्र.५. आपले मत मांडा :**


भारताच्या राष्ट्रीय सुरक्षिततेच्या दृष्टीने तटरक्षक दल का महत्त्वाचे आहे ?

**प्र.६. उत्तरे लिहा.**

i) एकात्मिक संरक्षण सेनाधिकारी मंडळाचे कार्य स्पष्ट करा.

ii) उच्चस्तरीय संरक्षण नियोजनाची रचना स्पष्ट करा.

**प्र.२. अ) संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**ब) वर्गातील भारताच्या नकाशाचे निरीक्षण करून नकाशात खालील ठिकाणे दाखवा आणि थोडक्यात माहिती लिहा.**

अ) उधमपूर     ब) कोची

क) शिलाँग

**उपक्रम :**

भारताच्या सुरक्षेविषयी कोणतीही बातमी वाचा. उदा. भारत-पाकिस्तान सीमा वाद, भारताकडून संरक्षण सामग्रीची आयात, इत्यादी त्यावर वर्गात चर्चा करा.